महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ५ दिनांक : २४/१२/२०२५ वार : बुधवार


## हिंदूंनी किमान ३ ते ४ मुले जन्माला घालावीत! - नवनीत राणा



**अमरावती** : एका मौलानाने त्यांना ४ बायका आणि १९ मुले असल्याचे सांगितले होते. यावरून भाजप नेत्या नवनीत राणा यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. एक मौलाना आहे तो म्हणाला की, मला चार बायका आणि १९ मुले आहेत. तो म्हणतो की मला ३०-३५ मुले पाहिजे होती. तो कोरम मी पूर्ण करू शकलो नाही याची लाज वाटते. ते जर खुल्यापणे चार बायका १९ मुले पाहिजे असे म्हणत असतील, तर आपल्या हिंदू लोकांनी किमान तीन-तीन-चार-चार मुले जन्माला घातली पाहिजे, असे राणा यांनी म्हटले आहे. मौलाना सय्यद कादरी यांनी आपल्याला ४ बायका आणि १९ मुले असल्याचे सणीतले होते. यावरून राणा यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नवनीत राणा म्हणाल्या, मी सगळ्या हिंदू लोकांना सांगते की जर ते खुलेपणे सांगत असतील की ४ बायका आणि १९ मुले आहेत तर आपण किमान तीन-तीन चार-चार मुले जन्माला घातली पाहिजेत. त्यांचा विचार आपल्या हिंदुस्थानला पाकिस्तानला बनवायचा आहे. ते मोठ्या संख्येने मुलं जन्माला घालत आहेत, तर मग आपण एका मुलावर का संतुष्ट राहतो? आपणही तीन ते चार मुले जन्माला घातली पाहिजेत यामध्ये काही दुमत नाही.

नवनीत राणा यांनी मुर्शिदाबाद येथील मशिदीच्या मुद्द्यावरून मोठे विधान केले होते. त्या म्हणाल्या होत्या की, कॉंग्रेसने आजवर समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केले आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनरजी यांच्या आमदारांनीही तेच करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला. तसेच जर बाबरच्या नावाने मशीद बांधली गेली, तर कारसेवक तिथे जातील, कारसेवा करतील आणि ती तोडण्याचे काम करतील, असेही विधान राणा यांनी केले.

दरम्यान, पुण्यात अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी युती करणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावर प्रतिक्रिया देताना नवनीत राणा म्हणाल्या, शरद पवार हे महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते आहेत. अजित दादा शरद पाव हा त्यांचा परिवार आहे. अजित पवार यांनी स्पष्ट सांगितले होते की मला भाजप सोबत जायला शरद पवार यांनी सांगितले होते. त्यामुळे दोन पवार एकत्र होत असतील, तर चांगलेच आहे. दोन ठाकरे एकत्र येत आहेत, त्यांची मजबूरी आहे. त्यासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येत आहेत, असेही नवनीत राणा म्हणाल्या.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे 'जल्लाद' हर्षवर्धन सपकाळांचा घणाघात



**मुंबई** : राज्यातील नगरपालिका निवडणुकीत भाजपने १२२ हून अधिक जागांवर विजय मिळवत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. भाजपच्या या ऐतिहासिक विजयानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता मुंबई महापालिका जिंकण्यासाठी महायुती सज्ज असल्याचा एल्गार पुकारला आहे. मात्र, भाजपच्या या यशावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांवर आणि भाजपच्या कार्यपद्धतीवर अत्यंत प्रखर शब्दांत टीका केली आहे.

भाजपला मिळालेल्या या पाशवी बहुमतावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांचा उल्लेख 'जल्लाद' असा केला. ते म्हणाले की, नगरपालिकांमध्ये मिळालेले हे यश म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी धोक्याचा इशारा आहे. सोबत असलेल्या मित्रपक्षाचा विश्वासघात करणे हा भाजपचा जुना स्वभाव आहे. २०२९ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत हे दोन्ही नेते भाजपसोबत दिसणार नाहीत.

हर्षवर्धन सपकाळ यांनी पुढे असाही दावा केला की, भाजपच्या या विस्तारवादी धोरणामुळेच महायुतीमधील एक गट आता पडद्यामागून विरोधकांशी हातमिळवणी करण्याच्या तयारीत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालानंतर काँग्रेसने प्रथमच आक्रमक पवित्रा घेतला आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांसाठी काँग्रेसने रणनीती आखली आहे. महापालिकेतील जागावाटप आणि आघाडीचे सर्व अधिकार स्थानिक पातळीवरील नेतृत्वाला देण्यात आले आहेत. तसेच 'इंडिया अलायन्स'सोबतच वंचित बहुजन आघाडी आणि शेतकरी संघटना यांच्याशी काँग्रेसची चर्चा सुरू आहे. होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीत काँग्रेस सर्वाधिक जागा जिंकेल, असा दावा सपकाळ यांनी केला आहे.

दुसरीकडे, भाजपने या विजयाला आपल्या राजकीय इतिहासातील सर्वात मोठे यश म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांच्या मेहनतीला दिले असून, आता पूर्ण ताकदीनिशी मुंबई महापालिकेच्या रणांगणात उतरण्याचे संकेत दिले आहेत.

## हिंदुत्व सोडल्याचा आरोप करत राजू वैद्यांचा ठाकरे गटाला रामराम



**मुंबई** : कट्टर हिंदुत्ववादी भूमिका मांडता यावी या एकाच उद्देशाने आपण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष सोडून भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे माजी महानगरप्रमुख राजू उर्फ रेणुकादास वैद्य यांनी केला आहे. भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करताच राजू वैद्य यांनी उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाची कास सोडली असल्याचा आरोप केला आहे. मुंबईमध्ये झालेल्या प्रवेश सोहळ्यात भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वैद्य यांचे पक्षात स्वागत केले.

यावेळी राजू वैद्य यांनी पक्षांतराबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली. महाविद्यालयीन जीवनापासून हिंदुत्व या एकाच अजेंडावर आम्ही काम करत आलो आहोत. मात्र आता मी ज्या पक्षात होतो, त्या पक्षात हिंदुत्ववादी भूमिका मांडणे शक्य नाही. त्यामुळे आपण पक्षांतर केले असल्याचे राजू वैद्य यांनी यावेळी सांगितले. पक्ष जी जबाबदारी देईल, ती जबाबदारी पार पाडण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे देखील ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगर शहराच्या विकासासाठी आपण हा पक्ष प्रवेश केला असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

राजू वैद्य यांच्या भाजपमध्ये प्रवेशाच्या चर्चांवर अंबादास दानवे म्हणाले की, परवापर्यंत राजू वैद्य आमच्यासोबत होते. अचानक काय घडलं हे समजत नाही. ते एक सक्षम आणि चांगले कार्यकर्ते होते. पक्षाने त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. तरीही त्यांनी हा निर्णय का घेतला, हे अनाकलनीय आहे. पक्षांतराच्या मुद्द्यावर भाष्य करताना दानवे यांनी स्पष्ट केलं की, प्रत्येक पक्षात काही ना काही अंतर्गत मतभेद असतात. मात्र उखाळ्या-पाखाळ्या काढण्यातून राजकीय संस्कृती सुधारत नाही. कोणत्या पक्षात मतभेद नसतात? पण त्यावर सार्वजनिक टीका करणे योग्य नाही, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात काँग्रेसचे माजी महापौर रशीद मामू यांच्या प्रवेशावरून राजकीय वातावरण तापले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते चंद्रकांत खैरे यांनी रशीद मामू यांच्या प्रवेशाला तीव्र विरोध दर्शवला आहे. रशीद मामूंना कोणत्याही परिस्थितीत तिकीट मिळू देणार नाही, अशी ठाम भूमिका खैरे यांनी घेतली आहे. चंद्रकांत खैरे आणि रशीद मामू यांच्यामध्ये वादावादी देखील झाले. त्याचा एक व्हिडिओ सुद्धा समोर आला आहे. त्यात आता राजू वैद्य यांनी देखील हिंदुत्वाच्या मुद्यावरुन ठाकरे गटावर आरोप केले आहेत. त्यामुळे ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर शहरातले राजकीय वातावरण तापले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ डिसेंबर २०२५


## ज्ञानेश्वर विद्यालयात मनपा आयुक्तांच्या हस्ते 'आयुर्वेदिक रोपवाटिकेचे' दिमाखात उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतींची ओळख व्हावी आणि निसर्गाचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालय येथे कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ आयुर्वेदिक रोपवाटिकेचे' शानदार उद्घाटन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत यांच्या शुभहस्ते या रोपवाटिकेचे लोकार्पण पार पडले.औषधी वनस्पतींच्या संवर्धनावर भरविद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष आयुर्वेदिक रोपवाटिका विकसित करण्यात आली आहे. यात तुळस, कोरफड, अडुळसा, गिलोय यांसारख्या विविध महत्त्वाच्या औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे.मान्यवरांची उपस्थितीया प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांनी मनपा आयुक्तांचे स्वागत करून या उपक्रमामागची भूमिका स्पष्ट केली.आयुक्तांचे प्रतिपादनउद्घाटनानंतर बोलताना मनपा आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, "आजच्या काळात आयुर्वेदिक वनस्पतींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शाळेतच अशा प्रकारची आयुर्वेदिक रोपवाटिका उभारल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वनस्पती पाहून त्यांचे औषधी गुणधर्म अभ्यासता येतील." त्यांनी शाळेच्या या नाविन्यपूर्ण प्रयत्नाचे विशेष कौतुक केले.या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ' यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू झालेला हा उपक्रम भविष्यात विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची खाण ठरेल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.

## जिंतूर तहसीलदार पदी शीतल कच्छवे रूजू




जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर येथील नूतन तहसीलदार म्हणून शितल कच्छवे यांनी पदभार स्वीकारला.जितूर चे तहसीलदार राजेश सरवदे यांची नुकतेच बदली झाल्यानंतर या ठिकाणी नवीन तहसीलदार म्हणून शितल कच्छवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी दिनांक २२ डिसेंबर रोजी जितूर तहसील कार्यालयाचा पदभार स्वीकारला त्यावेळी अनेकांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले पत्रकारांच्या वतीने साले चाउस यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या.

## "मर्मगंध व अंगत पंगत"ला साहित्य पुरस्कार प्रदान









छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : हिंगोली जिल्ह्यातील समृध्दी संस्थेच्या वतीने 2025 चा संत नामदेव साहित्य पुरस्कार अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या " मर्मगंध " या प्रौढ कविता संग्रह आणि " अंगत पंगत" बाल कवितासंग्रहाला ऑनलाईन कार्यक्रमाद्वारे साहित्य पुरस्कार सोहळ्यात प्रदान करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे आहे. यावेळी समृद्धी संस्थेचे संयोजक प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे, प्रा. डॉ. बाबुराव खंदारे, प्रा. डॉ. नवीन सोळंके हे संत नामदेव साहित्य पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला हिंगोली येथे उपस्थित होते. "मर्मगंध" प्रौढ कवितासंग्रहात जगण्याचा प्रतिबिंब प्रतीत होते, तर "अंगत पंगत" या बाल कविता संग्रहात बालकांचा भावविश्वाला आनंद प्रतीत होतो. कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या या दोन्हीही कवितासंग्रहातील कविता ह्या वाचकाच्या ऱ्हदयाचा ठाव घेणाऱ्या असून आशयघन व दर्जेदार कविता आहे. त्यामध्ये वास्तववादी जगण्याचे तत्वज्ञान आहे. "मर्मगंध आणि अंगत पंगत " ला संत नामदेव साहित्य पुरस्कार मिळाल्याने अय्युब पठाण लोहगांवकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## जिल्हा परिषद प्रशाला बहिरगावच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला 'गौताळा'चा निसर्ग खजिना





बहिरगाव प्रतिनिधी : निसर्ग संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी आणि त्यांना वन्यजीव सृष्टीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव (ता. कन्नड) येथील विद्यार्थ्यांसाठी 'राष्ट्रीय हरित सेना' व सामाजिक वनीकरण विभाग, परिक्षेत्र कार्यालय कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने गौताळा अभयारण्यात एक दिवसीय निसर्ग शिबिराचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.या शिबिरादरम्यान परिक्षेत्र अधिकारी ए. एम. काटकर, वनपाल नितीन घोडके, हनुक घोरपडे, कदीर पठाण आणि वनरक्षक संध्या खाडे यांनी विद्यार्थ्यांना अभयारण्यातील जैवविविधतेची सविस्तर माहिती दिली. तसेच तसेच विद्यार्थ्यांनी अभयारण्यातील दुर्मिळ वनस्पती, औषधी झाडे आणि विविध पक्ष्यांच्या प्रजातींचे जवळून निरीक्षण केले. विशेषतः वन्यजीवांचा अधिवास कसा असतो, हे समजून घेताना विद्यार्थ्यांनी बिबट पॉइंटला भेट दिली. बिबट्याचे दर्शन कोणत्या भागात होते आणि वन विभाग त्यांचे संरक्षण कसे करतो, याची रंजक माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी वन्यजीव सचिन शिंदे यांनी दिली. तसेच वॉच टॉवरवरून विद्यार्थ्यांनी निसर्गाचे विहंगम दृश्य अनुभवले आणि ऐतिहासिक सीतानहाणी परिसराची माहिती जाणून घेतली.निसर्गाच्या सानिध्यात मिळालेल्या या प्रत्यक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता. पर्यावरणाचे रक्षण करण्याची शपथ घेत व भोजनाचा आनंद घेऊन निसर्ग सहलीची सांगता झालीमुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमात शाळेचे शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, श्याम खोसरे, सलिम आतार , श्रीमती किरण पाटील, राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे ,गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे यांनी सहकार्य केले .


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ डिसेंबर २०२५


## चौथे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे श्रीरामपूर येथे आयोजन

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, बोल्डा, तालुका कळमनुरीच्या वतिने आयोजित भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंती निमित्त एकदिवसीय चौथे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन दिनांक ११ /०१/२०२६ वार रविवार रोजी श्रीरामपूर, (अ. नगर ) या ठिकाणी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या एकदिवसीय साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी देहू येथिल ज्येष्ठ साहित्यिका महेमुदा रसूल शेख यांची निवड करण्यात आली आहे.या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉक्टर सलीम शेख, कार्याध्यक्ष म्हणून कवयित्री दिलशाद सय्यद, कवी रज्जाक शेख यांची निवड केंद्रीय कार्यकारिणीने केली आहे. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था आयोजित पहिले फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन पुणे येथे आयोजीत केले होते. तर दुसरे साहित्य संमेलन सोलापूर येथे तर तिसरे साहित्य संमेलन लातूर येथे थाटात संपन्न झाले. आता चौथे साहित्य संमेलन श्रीरामपूर जिल्हा अ.नगर येथे आयोजित करण्यात आले आहे.साहित्य संमेलन आयोजनाचा उद्देश हा प्राचीन आणि अर्वाचीन मराठी साहित्यात अनेक मुस्लिम मराठी संत कवी आणि साहित्यिकांचे योगदान राहिलेले आहे. मराठी भाषिक मुस्लिम समाज महाराष्ट्राच्या संत, पुरोगामी, परिवर्तनवादी परंपरेचा वारसा सातत्याने अभिव्यक्त व्हावा. मराठी भाषेतून मुस्लिम साहित्यिकांनी लिहिलेल्या साहित्यावर विचार मंथन व्हावे. हेतूत: मुस्लिम मराठी साहित्याचा , समाजाचा प्रवाह अधिक वृद्धिंगत करून मुस्लिम समाजाच्या व्यथा, वेदना, दु:ख आणि अस्मितेची जाणीव साहित्यातून मांडणे, जाणिव पसरवलेले मुस्लिम समाजाविषयीचे समज, गैरसमज दूर करण्याच्या हेतूने हे संमेलन प्रयत्नशील राहणार आहे.मुस्लिम समुदायातून लिहिणाऱ्या अनेक लेखकांना नवे विचारपीठ उपलब्ध करून देणे आणि साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि वैचारिक सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्यासाठी हे संमेलन आयोजित केले आहे . या संमेलनाला श्रीरामपूरमधील साहित्यावर प्रेम करणाऱ्या सर्व मंडळींनी उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामीण मस्लिम मराठी साहित्य संस्थेचे अध्यक्ष ॲड. हाशम इस्माईल पटेल ,ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे संस्थापक शेख शफी बोल्डेकर, उपाध्यक्ष खाजाभाई बागवान, सहसचिव अनिसा सिकंदर शेख, सचिव डॉक्टर सय्यद जब्बार पटेल, केंद्रीय कार्याध्यक्ष इस्माईल शेख, विश्वस्त जाफर शेख ,महासेन प्रधान यांनी केले आहे.

# शिवसृष्टी पाहून विद्यार्थी भारावले, जाणून घेतला इतिहास



**कन्नड (अरुण थोरात) :** काशिनाथ पाटील प्राथमिक विद्यालय व शिक्षण महर्षी स्व के के जाधव सर माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल ही कोकण विभागात गेलेली होती या शैक्षणिक सहली दरम्यान रत्नागिरी येथील नव्याने सुरू झालेल्या शिवसृष्टीला भेट दिली असता, यावेळी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री उदय जी सामंत यांनी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाच्या या विद्यार्थ्यांची भेट घेतली, एवढ्या दूर शिवसृष्टी बघायला आल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुकही केले, छत्रपती शिवरायांच्या पराक्रमी इतिहासाचे साक्षीदार असणारे महापुरुष बाजी प्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे यांचे स्मारक विविध प्रतापगड रायगड सिंधुदुर्ग यासारख्या किल्ल्यांच्या तसेच महाराजांनी स्थापन केलेल्या नौदलातील जहाजाच्या अप्रतिम कलाकृतीची निर्मिती या शिवसृष्टी मध्ये करण्यात आलेली आहे, हे पाहून विद्यार्थी आनंदाने भारावून गेले होते. यावेळी मुख्यमंत्री सहायता कक्षाचे मंगेश चिवटे, शिवसृष्टीचे निर्माते विरेंद्र वनाजू, नेताजी पाटील, विकास पाटील, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे उदय जाधव, योगेश जंजाळ, जगमोहन मुंडवाडकर, दीपक जाधव, ज्ञानेश्वर नायकुडे, लक्ष्मण पांडव दत्तात्रय गायके, भगवान म्हैसमाळे, सुभाष जाधव, सुनीता दापके, सुनीता बाविस्कर यांची उपस्थिती होती.

# बोर्डीकर पोतदार लार्न स्कूलचा ऊस्फुर्त प्रतिसाद



**जिंतूर (बि. डी. रामपूरकर) :** जिंतूर येथील बोर्डीकर पोतदार लार्न स्कूलच्या बालक विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद देत राजभाषा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. राष्ट्रभाषा विकास परिषद पुणे द्वारा आयोजित केलेली अखिल भारतीय स्वातंत्र् राजभाषा परीक्षा काही कालावधीपूर्वी संपन्न झाली होती. या स्पर्धेत बोर्डीकर पोतदार लार्न स्कूल च्या बालकांनी उत्कृष्ठ सहभाग नोंदविला होता. यशस्वी बालकांचे प्रमाणपत्रे वाटप कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये कु. सानवी संदीप वजीर, सिद्धी कुकडे, आराध्या डोंबे, श्रद्धा कराळे, नायरा आढे, मुटकुळे, मोहरे, भुते, सरोदे यांच्यासह अन्य बालकांचा समावेश होता. यशस्वी बालकांचे अभिनंदन अध्यक्षा भावनाताई बोर्डीकर, मुख्याध्यापक अनन्यपाल, विक्रम रोकडे यांचेसह अध्यकांनी अभिनंदन केले आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ डिसेंबर २०२५

## एनसीसी दिना निमित्त भव्य रक्तदान शिबिरात ५१ जणांनी केले रक्तदान



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे एनसीसी व एनएसएस , एचडीएफसी बँक , श्रीकृष्ण रक्तपेढी, रोटरी क्लब उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात अस्वले सरांनी रक्तदान केल्यामुळे हृदयरोग, कँसर, मधुमेह , रक्तदाब ,यासारखे रोग होण्याचा धोका कमी होतो. रक्तदान हे सर्वश्रेष्ठदान आहे या उक्ती प्रमाणे प्रत्येक व्यक्तिने रक्तदान करून एखाद्या गरजवंतास जीवदान देऊन त्याचे प्राण वाचववे . उमरगा शहर हे महामार्गावर असल्यामुळे अनेक अपघाताचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे अनेक रक्तपेढया मध्ये रक्त कमी पडत असते अशावेळी श्रीकृष्ण रक्तपेढी गरजुंना मदत करत असते तसेच रोटरी क्लब ,भारतातील अग्रगण्य अशी एचएफडीसी बँक नेहमी सामाजिक कार्य करत असते यासाठी अनेक सामाजिकसंस्था, महाविद्यालयाने असे कार्यक्रम घेऊन व्यक्तिचे प्राण वाचवावे असे आव्हान त्यांनी केले . या शिबिरामध्ये एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एचडीएफसी बँकेचे मॅनेजर श्री आशिष बिराजदार , डॉ धनंजय मेनकुदळे, प्रा आर एम जोशी, विजय केवडकर उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, डॉ भरत शेळके डॉ अशोक पदमपल्ले, डॉ विनोद देवरकर, प्रा गुंडाबापू मोरे, प्रा शैलेश महामुनी बँकेचे, रक्तपेढीचे सर्व कर्मचारी महाविद्यालयीन प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी,मोठ्या संख्येने एनसीसी कॅडेट्स व एनएसएस स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते. या उद्‌घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. अनिल देशमुख, केले तर कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी उपस्थितांचे आभार मानले .

## वाद्यांची सभा

संगीतातील वाद्यांची पार पडली सभा
कुणी कुठं जायचं होती त्यांना मुभा

विठ्ठलाच्या मंदीरात वाजू लागली वीणा
पोवाड्यात वाजे तुतारी पुन्हा पुन्हा

अभंगात वाजे चिपळ्या नि टाळ
वारकरी नाचे घालूनी तुळशी माळ

पेटीमधून निनादे संगीतातले सप्तसूर
मंदीरातील घंटानाद ऐकू येई दूर दूर

संबळ ऐटीत वाजे देविच्या गोंधळात
मृदंगाने धरला ठेका काल्याच्या किर्तनात

ढोलकीच्या तालावर नाचे नृत्यांगना
बालक बासरी वाजवी होऊनी कान्हा

बॅन्डच्या तालावर नाचे वरातीतला घोडा
शुभ कार्यात वाजे सनई आणि चौघडा

तबल्यावर थाप पडता सुरू होई गाने
भारूड सुरू होता वाजे तुणतुणे



• रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## कालिकादेवी विद्यालयाची, शैक्षणिक सहल आनंदात व उत्साहात संपन्न





**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची,'शैक्षणिक सहल' दि.18 डिसेंबर 2025 ते दि.23 डिसेंबर 2025 या कालावधीत विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय आनंदात व उत्साहात पार पडली.ही शैक्षणिक सहल शिरूर(कासार)ते श्री क्षेत्र पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन करून श्री क्षेत्र दत्त संस्थान नृसिंहाचीवाडी व कोल्हापूरच्या येथे पोहोंचली आणि श्री महालक्ष्मीचे मंदिर,ऐतिहासिक शाहू पॅलेस, रंकाळा तलाव,राधानगरी धरण या पर्यटन स्थळांचे सूक्ष्म निरीक्षण केल्याने कलात्मक गुणांना प्रेरणा मिळाली. कुडाळ येथे (मुक्काम) पुढे गोवा राज्यातील कलिंगुट बीच,तेथील प्रसिद्ध चर्च,श्री मंगेशी मंदिर,श्री शांता दुर्गा मंदिर तसेच जगप्रसिद्ध भव्य-दिव्य 'बिर्ला मंदिर'या स्थळांचा नयनरम्य देखावा पाहिला.पुन्हा कुडाळ(मुक्काम)नंतर सिंधुदुर्ग किल्ला मालवण गणपतीपुळे तेथील समुद्राची भरती-ओहोटी,समुद्राची गाज व रोषणाई पाहिली.पुढे त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध श्री क्षेत्र नाणीजधाम व सातारा जिल्ह्यातील सज्जनगड क्षेत्र नाणीजधाम (मुक्काम) आणि पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथील प्रसिद्ध श्री क्षेत्र खंडेरायाचे दर्शन घेतले पुढे श्री क्षेत्र मोरगांव येथील श्री मयुरेश्वरांचे दर्शन घेऊन मोरगाव मार्गे शिरूर (कासार)असा मार्ग होता. महाराष्ट्रातील प्रसिद्ध असे ऐतिहासिक ठिकाणे,गड-किल्ले,निसर्गरम्य पर्यटणस्थळे व सौंदर्यस्थळांना भेटी दिल्यामुळे,विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना प्रेरणा मिळाली.विद्यार्थ्यांना आपल्या शूर राजांचा,सेनापतींचा व सैनिकांचा इतिहास आकलन व्हावा,हा या शैक्षणिक सहलीचा उद्देश होता.तो साध्य करत विद्यार्थ्यांनी विविध स्थळांचा, गड-किल्यांचा आनंद घेतला. खेळीमेळीच्या हर्ष-उल्हासात,गाण्यांच्या व गावअक्षरांच्या भेंड्या खेळत, मौज-मजा करत सहलीचा भरभरून आनंद घेतला.या सहलीच्या नियोजनासाठी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे, प्रा. नामदेव तरकसे प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड,प्रा.महादेव हांगे,रविंद्र बडे,जयेंद्र निकम,प्रा.सविता दराडे मॅडम,सौ.अनिता लाटे मॅडम इत्यादी शिक्षकांनी मेहनत घेतली.अशा प्रकारे विद्यालयाची शैक्षणिक सहल अतिशय आनंदात व उत्साहात संपन्न झाली व सुखरूप शाळेत पोहोंचली.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ डिसेंबर २०२५

# ग्राहक हक्कांचे सामाजिक वास्तव

दरवर्षी 24 डिसेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन हा केवळ एका कायदेशीर तरतुदीची आठवण करून देणारा दिवस नसून तो आधुनिक समाजातील बाजारपेठेचे स्वरूप, ग्राहकाचे स्थान आणि लोकशाही मूल्यांची कसोटी लावणारा महत्त्वाचा प्रसंग आहे. औद्योगिकीकरणानंतर आणि विशेषतः जागतिकीकरण व डिजिटल क्रांतीनंतर बाजारव्यवस्था अधिक व्यापक, वेगवान आणि गुंतागुंतीची झाली आहे. या प्रक्रियेत ग्राहक हा केवळ वस्तू किंवा सेवा खरेदी करणारा घटक न राहता तो आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेतील एक महत्त्वाचा सहभागी घटक बनला आहे. त्यामुळे ग्राहक हक्कांचा विचार करताना केवळ कायदे, नियम किंवा तक्रार निवारण यापुरते मर्यादित न राहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्याचे व्यापक सामाजिक परिणाम समजून घेणे अत्यावश्यक ठरते.समाजशास्त्र बाजारपेठेकडे केवळ आर्थिक व्यवहारांची जागा म्हणून पाहत नाही, तर ती सत्तासंबंध, विषमता, वर्गरचना आणि सांस्कृतिक प्रभाव यांचे प्रतिबिंब मानते. बाजारात उत्पादक, व्यापारी, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि सेवा पुरवठादार यांच्याकडे प्रचंड भांडवल, माहिती, जाहिरातशक्ती आणि निर्णयक्षमता एकवटलेली असते. याउलट सामान्य ग्राहक अनेकदा मर्यादित माहिती, आर्थिक गरज, वेळेची टंचाई आणि सामाजिक दबाव यांखाली निर्णय घेत असतो. या असमतोलातूनच ग्राहक शोषणाची बीजे रुजतात. भेसळयुक्त अन्नपदार्थ, निकृष्ट औषधे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, लपविलेल्या अटी-शर्ती, अवाजवी दर आणि अपुऱ्या सेवा या समस्या आजच्या बाजारव्यवस्थेत सामान्य झालेल्या दिसतात. हे प्रकार केवळ वैयक्तिक नुकसान घडवत नाहीत, तर समाजाच्या आरोग्यावर, विश्वासावर आणि नैतिकतेवरही खोल परिणाम करतात.भारतीय समाजरचनेत ग्राहक हा एकसारखा नसून तो विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांमध्ये विभागलेला आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील ग्राहकांचे अनुभव, अडचणी आणि संधी वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत. ग्रामीण भागातील ग्राहक अजूनही स्थानिक दुकानदार, सावकार किंवा मर्यादित सेवा पुरवठादारांवर अवलंबून असतो. त्याच्याकडे पर्यायांची कमतरता असते, तक्रार करण्याची प्रक्रिया माहिती नसते किंवा सामाजिक संबंध बिघडतील या भीतीने तो अन्याय सहन करतो. अनेकदा अशिक्षित किंवा अर्धशिक्षित ग्राहकांना करारातील अटी, मोजमापातील फसवणूक किंवा गुणवत्तेतील तफावत समजून घेणे कठीण जाते. याउलट शहरी भागातील ग्राहकांकडे पर्याय अधिक असले तरी करारांची गुंतागुंत, सेवा क्षेत्रातील अस्पष्टता आणि डिजिटल व्यवहारांमुळे शोषणाचे नवे प्रकार उदयास आलेले दिसतात. त्यामुळे ग्राहक हक्कांचा प्रश्न हा केवळ व्यक्तीपुरता मर्यादित न राहता सामाजिक संरचनेशी घट्टपणे जोडलेला आहे.ग्राहक हक्कांची संकल्पना ही मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समाविष्ट आहे. सुरक्षिततेचा हक्क, माहितीचा हक्क, निवडीचा हक्क, ऐकून घेण्याचा हक्क, भरपाईचा हक्क आणि ग्राहक शिक्षणाचा हक्क हे शब्द केवळ कायदेशीर भाषेतील संज्ञा नसून ते मानवी प्रतिष्ठा, आरोग्य आणि जीवनमानाशी निगडित मूल्ये आहेत. सुरक्षिततेचा हक्क म्हणजे केवळ धोकादायक वस्तूंपासून संरक्षण नव्हे, तर भेसळयुक्त अन्न, निकृष्ट औषधे, असुरक्षित वाहतूक सेवा आणि अपुऱ्या आरोग्य सुविधा यांपासून समाजाचे रक्षण करणे होय. अशा उल्लंघनांचा परिणाम थेट सार्वजनिक आरोग्यावर होतो आणि त्याचा आर्थिक व सामाजिक भार संपूर्ण समाजाला सहन करावा लागतो.माहितीचा हक्क हा जाहिरातप्रधान आणि ब्रँड-केंद्रित समाजात विशेष महत्त्वाचा ठरतो. आकर्षक जाहिराती, सवलतींचे आमिष आणि आभासी प्रतिमा यांच्या प्रभावाखाली ग्राहक अनेकदा वास्तवापासून दूर जातो. वस्तूंचा खरा दर्जा, घटक, उपयोग, दुष्परिणाम आणि अटी यांची स्पष्ट माहिती मिळणे हा ग्राहकाचा मूलभूत हक्क आहे. परंतु साक्षरतेतील असमानता, भाषेची अडचण आणि तांत्रिक माहितीची गुंतागुंत यामुळे अनेक ग्राहक या माहितीपासून वंचित राहतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'माहितीतील विषमता'चे गंभीर उदाहरण आहे, जे आर्थिक विषमतेइतकेच समाजासाठी घातक ठरते.निवडीचा हक्क हा बाजारपेठेतील स्वातंत्र्याचे प्रतीक मानला जातो, परंतु प्रत्यक्षात तो अनेक मर्यादांनी बांधलेला असतो. मक्तेदारी, सांठगाठ, ब्रँडचे वर्चस्व आणि जाहिरातींचा सततचा मारा यामुळे ग्राहकाची निवड अनेकदा नियंत्रित होते. ग्रामीण भागात तर पर्यायांचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील अवलंबित्व यामुळे निवडीचा हक्क कागदावरच राहतो. त्यामुळे निवडीचा हक्क प्रत्यक्षात प्रभावी करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप, स्पर्धात्मक वातावरण आणि सामाजिक नियमनाची गरज भासते.ग्राहकांचे ऐकून घेणे आणि त्यांना न्याय देणे ही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत अट आहे. परंतु प्रत्यक्षात तक्रार नोंदविण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया, न्याय मिळविण्यास लागणारा वेळ आणि खर्च यामुळे अनेक ग्राहक न्यायप्रक्रियेपासून दूर राहतात. विशेषतः गरीब, वृद्ध, महिला आणि वंचित घटकांसाठी ही प्रक्रिया अधिक कठीण ठरते. समाजशास्त्र येथे 'प्रवेशयोग्यता' या संकल्पनेवर भर देते. हक्क अस्तित्वात असणे पुरेसे नसून ते सर्वांसाठी सुलभ, स्वस्त आणि समजण्यासारखे असणे तितकेच महत्त्वाचे आहे.डिजिटल युगात ग्राहक हक्कांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. ऑनलाइन खरेदी, डिजिटल पेमेंट, ॲप-आधारित सेवा आणि सोशल मीडिया जाहिरातींमुळे ग्राहकांचे जीवन जरी सोयीचे झाले असले तरी फसवणूक, डेटा चोरी, गोपनीयतेचा भंग आणि सायबर गुन्हे यांचा धोका वाढलेला आहे. डिजिटल साक्षरतेतील तफावतामुळे अनेक ग्राहक या नव्या धोक्यांसमोर असुरक्षित राहतात. त्यामुळे आज ग्राहक हक्कांचा विचार करताना डिजिटल सुरक्षा, माहिती संरक्षण आणि तांत्रिक जागरूकता हे नवे सामाजिक मुद्दे केंद्रस्थानी आलेले आहेत.ग्राहक चळवळी, स्वयंसेवी संस्था आणि माध्यमांनी समाजात ग्राहक जागृती निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तरीही मोठ्या प्रमाणावर ग्राहक अजूनही आपल्या हक्कांबाबत अनभिज्ञ आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोन ग्राहकाला केवळ खरेदीदार न मानता एक हक्कधारक नागरिक म्हणून पाहतो. ही जाणीव समाजात रुजविणे ही काळाची गरज आहे, कारण सजग ग्राहकच बाजारपेठेला नैतिक आणि जबाबदार बनवू शकतो.ग्राहक हक्कांचा प्रश्न हा केवळ वैयक्तिक अन्यायापुरता मर्यादित नसून तो सामाजिक न्यायाशी जोडलेला आहे. जेव्हा गरीब ग्राहकाची फसवणूक होते, तेव्हा त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर आणि समुदायावर होतो. कर्जबाजारीपणा, आरोग्यावरील वाढता खर्च, मानसिक ताणतणाव आणि सामाजिक अस्थैर्य या समस्या निर्माण होतात. त्यामुळे ग्राहक संरक्षण ही सामाजिक कल्याणाची एक महत्त्वाची बाजू ठरते.राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने आपण केवळ कायद्यांची आठवण करून देणे पुरेसे नाही, तर आपल्या ग्राहक संस्कृतीवर आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. आपण किती सजग आहोत, किती वेळा प्रश्न विचारतो, पावती घेतो, अटी वाचतो किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवेत. ग्राहक म्हणून जागरूक होणे म्हणजे केवळ स्वतःचे नुकसान टाळणे नव्हे, तर बाजारपेठ अधिक पारदर्शक, नैतिक आणि मानवी बनविण्यास हातभार लावणे होय.शेवटी, राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की ग्राहक हा बाजारपेठेतील दुर्बल घटक नसून तो लोकशाहीचा एक सजग नागरिक आहे. त्याचे हक्क, त्याची सुरक्षितता आणि त्याची प्रतिष्ठा ही समाजाच्या प्रगतीची खरी मोजपट्टी आहे. या दिनानिमित्ताने ग्राहक शिक्षण, सामाजिक जागृती आणि सामूहिक जबाबदारीची भावना दृढ केली, तरच ग्राहक हक्कांचा खरा अर्थ साकार होईल आणि बाजारपेठ मानवी मूल्यांनी समृद्ध होईल.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002